महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत, तिसरा मजला, सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई- ४०००३० , दुरध्वनी क्र.०२२-२७५६०१४५
ई-मेल-dmainfo४@gmail.com WebSite- https://mahadma.maharashtra.gov.in

क्र. नपप्रसं/आस्था/वाहनचालक/दरपत्रक/२०२५/कक्ष-१/4658 दिनांक:- 16 JUN 2025

# जाहीर सूचना

**बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ (वाहनचालक ) पुरविणाऱ्या संस्थांकडून दरपत्रक मागविण्याबाबत.**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय कार्यालयाकरिता बाह्ययंत्रणेद्वारे मानधन तत्वावर कंत्राटी वाहनचालक घेणे आहे, यावास्तव खुल्या बाजारातील इच्छुक पुरवठादारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने कामगार आयुक्त यांचे कार्यालय दि. २०.०२.२०२५ अन्वये किमान वेतन व कंत्राटदार याने भरावयाचा नमुना खालीलप्रमाणे.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | तपशिल | उमेदवार संख्या | कालावधी | अंदाजित वेतन (मासिक) | सर्विस चार्जेस (मासिक ) | एकूण खर्च (रकाना ५ + ६ यांची बेरीज) मासिक | एकूण खर्चावर १८ % प्रमाणे GST (मासिक) | एकूण मासिक खर्च |
| १ | वाहनचालक वर्गीय मनुष्यबळ | १ | ११ महिने | रु. २५,८२१/- | कंत्राटदाराने मासिक सर्विस चार्ज नमूद करावा. | वाहनचालकावर होणारा अंदाजित वेतन व सर्विस चार्ज याची बेरीज | रकाना ७ वर १८ GST | एकूण खर्च +१८ GST रकाना ७ व ८ ची बेरीज |

खुल्या बाजारातील इच्छुक पुरवठादारांकडून सीलबंद पाकिटात दरपत्रक दि. १७/०६/२०२५ पासून दि. २३/०६/२०२५ पर्यत सायंकाळी ५:३० वाजेपर्यत कार्यालयात सक्षम स्वीकारली जातील. पाकिटावर बाह्ययंत्रणेद्वारे वाहनचालक पुरवठा करणेबाबतचे दरपत्रक असे नमूद करणे आवश्यक आहे.

तसेच दरपत्रक पुरवठादार/प्रतिनिधी यांच्या सक्षम उघडली जाणार असल्यामुळे दि. २४/०६/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यत पुरवठादार/ प्रतिनिधी यांनी नगरपरिषद प्रशासन संचालनालय, ७ वा मजला, बेलापूर भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४ येते उपस्थित राहावे.

अटी व शर्ती

१) दि. २३/०६/२०२५ रोजी सायंकाळी ५:३० नंतर प्राप्त दरपत्रक कार्यालयात स्वीकारली जाणार नाहीत.

२) रकाना ५ मध्ये नमूद किमान दरापेक्षा कमी दर नमूद केल्यास दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही.

३) नमूद दर हे GST सह असावे, नमूद दारावर GST देण्यात येणार नाही.

४) १ वर्षाचा कालावधीकरिता करारनामा झाल्यावर त्वरित सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

५) बाह्ययंत्रणेद्वारे पुरविण्यात येणाऱ्या वाहनचालकाकडे मोटारवाहन चालवण्याचे लायसन्स आवश्यक आहे.

६) बाह्ययंत्रणेद्वारे पुरविण्यात येणाऱ्या वाहनचालकाकडे वाहनचालविण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव हवा.

७) दरपत्रकासोबत दरपत्रकधारकाने आधारकार्ड व पॅन कार्डचे झेरोक्स सोबत जोडावे

८) कार्यादेश प्राप्त झाल्यावर १५ दिवसात रु. ५०० च्या स्टॅंप पेपरवर प्रथम १ वर्ष कालावधीकरिता करारनामा सादर करावा लागेल

९) दरपत्रक प्रक्रियेसंबधीचे सर्व अधिकार मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे राहतील. दरपत्रकेबाबत मा. आयुक्त तथा संचालक यांचा निर्णय अंतिम राहील.

दि.

**( बारिंद्रकुमार गावीत )**
**सहायक आयुक्त**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई**